बीड । शुक्रवार
१६.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ४५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१






*अंबाजोगाई : ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर, राष्ट्रभक्ती जागृती अभियान अंतर्गत केज विधानसभा क्षेत्रात देशप्रेम जागवणाऱ्या भव्य तिरंगा मोटारसायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवार ०८:३० वाजता 'अक्षय निवास', रिंग रोड येथून ही देशभक्तीपर यात्रा रवाना झाली. संपूर्ण शहरातून मार्गक्रमण करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात राष्ट्रगीताच्या स्वरात या यात्रेची सांगता झाली. या यात्रेमध्ये आदरणीय नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा, आ. नमिता ताई मुंदडा. अक्षय भैय्या मुंदडा.यांच्यासह शहरातील नागरिक, माजी सैनिक, महिलावर्ग, युवक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी फेर प्रभाग रचना करा

## निवडणूक आयोगाचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात तीन ते चार वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घ्या, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाने कार्यवाही सुरू केली आहे. आयोगाने या निवडणुकांच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा अशा सूचना राज्य सरकारला दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या



निवडणुकांची अधिसूचना देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुका लवकर घेण्यास सांगण्यात आले होते. राज्यात पाच वर्षापेक्षा अनेक प्रकरणात प्रशासक कार्यरत आहे. ओबीसी आरक्षणाबाबत २०२२ मध्ये सादर झालेल्या बांठीया आयोगाच्या अहवालाआधी जे प्रमाण होते, त्यानुसारच आरक्षण देण्यात यावे, असेही स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले होते.

न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाने कार्यवाहीस सुरूवात केली आहे. या निवडणुकांच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा असे निर्देश निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत. निवडणुका घेण्यासाठी महापालिका, नगर परिषदा, नगर पंचायतींच्या प्रभाग रचना तयार करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे आदेश बुधवारी आयोगाने दिले होते. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी झेडपी गट आणि पंचायत समित्यांच्या गणांची रचना करण्याचेही आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य सरकारला आता प्रभाग रचना आणि ग्रामीण भागात गट आणि गणांच्या फेर रचनेचे काम युद्धपातळीवर हातात घ्यावे लागणार आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# आ. नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या तिरंगा यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

'ऑपरेशन सिंदूर च्या ऐतिहासिक यशानंतर राष्ट्रभक्ती जागृती अभियानाच्या अंतर्गत केज विधानसभा मतदारसंघात आ. नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोटारसायकल तिरंगा यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आज सकाळी ८:३० वाजता 'अक्षय निवास', रिंग रोड येथून या मोटारसायकल तिरंगा यात्रेची सुरुवात झाली. देशभक्तीचे स्वर, युवकांची ऊर्जा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसर भारावून निघाला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सामूहिक राष्ट्रगीताने या यात्रेचा समारोप झाला. या यात्रेला नंदकिशोर मुंदडा, आ. नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, डॉ. नवनाथ घुगे, डॉ. सुधीर धर्म पात्रे, डॉ. निशिकांत पाचेगावकर, डॉ. श्रीनिवास रेड्डी, अनंत अरसुडे, शहराध्यक्ष संजय गंभीरे यांच्यासह भाजपाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर, महिला व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### पदभार हाती घेताच सरन्यायाधीश गवई यांनी मराठा आरक्षणासंदर्भात दिले आदेश..

# नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय द्या

**मुंबई । प्रतिनिधीं**

राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत गेल्या दोन वर्षापासून राज्य सरकारस्तरावर बोलणी सुरु आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून जालना येथील अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार आंदोलन व आमरण उपोषण करुन राज्य सरकाराला जेरीस आणले होते. यानंतर आता मराठा आरक्षणावर मोठी अपडेट येत आहे.

सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीश पदाचा पदभार गुरुवारी हाती घेताच सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मराठा



आरक्षणासंदर्भात आदेश दिले आहेत. त्यांनी मराठा आरक्षण संदर्भात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय देण्याचे आदेश दिले आहेत. सुप्रीम कोर्टाने महत्त्वपूर्ण निर्देश दिल्याने येत्या काळात मराठा आरक्षणाचा मुद्दा लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काळात लवकरच हा मुद्दा निकाली लागणार असल्याने सर्वांचे त्याकडे लक्ष लागले आहे. मराठा आरक्षणाच्या याचिकेवर गेल्या पाच महिन्यापासून सुनावणी झाली नव्हती. जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. न्यायमूर्ती उपाध्याय हे पूर्ण किंवा तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग होते जे गेल्या वर्षी एप्रिलपासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय कायदा, २०२४ विरुद्धच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# वरिष्ठ हवालदाराला मिळाले पीएसआयचे अधिकार; गुन्ह्याचा छडा लावणार

**मुंबई । प्रतिनिधी**

आता वरिष्ठ पोलिस हवालदाराला पोलिस उपनिरीक्षकाचे अधिकार देण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आलायं. याआधी पोलिस उपनिरीक्षकपदापासून वरिष्ठ अधिकारी एखाद्या गुन्ह्याचा तपास करीत असत, मात्र आता पोलिस वरिष्ठ हवालदारही गुन्ह्याचा तपास करणार आहे. गृह खात्यात मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेत राज्य सरकारने हा निर्णय घेतलायं. राज्य सरकारने यासंदर्भात राजपत्र जारी केलं आहे. राज्य सरकारकडून जारी करण्यात आलेल्या राजपत्रात म्हटले, पोलिस वरिष्ठ हवालदार



हा पदवीधर असावा, त्याने पोलिस खात्यात सात वर्षे सेवा केलेली असावी. यासोबतच नाशिक येथील गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयात हवालदाराने विशेष प्रशिक्षण पूर्ण आणि उत्तीर्ण असणं गरजेचं राहणार आहे, असा पोलिस वरिष्ठ हवालदार गुन्ह्याचा तपास करणार असल्याचं राजपत्रात स्पष्ट करण्यात आलंय. राज्यातील शहरी भागात मनुष्यबळ कमी असले तरीही पोलिस

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'सोडूनी सारी लाज, क्यूआर कोडने घेतली लाच' दोन पोलिस अन् एका खबऱ्याला अटक

**ठाणे । प्रतिनिधी**

पूर्वी लाच ही थेट मागितली जायची किंवा कुणा मध्यस्थीद्वारे स्वीकारली जायची. पण आता आधुनिक काळात लाच मागण्याची पद्धतही बदलली असल्याचे ठाण्यातील मोबाइल डेटा चोरी प्रकरणातून उघड झाले आहे. पोलिसाने थेट क्यूआर कोड स्कॅन करून पैसे मागितल्याने 'मी सोडूनी सारी लाज, क्यूआर कोडने घेतली लाच' अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

मोबाइल फोन क्रमांकाचा डेटा चोरून विकला जात असल्याची




माहिती एटीएसला समजली आणि या प्रकरणाला वाचा फुटली. तब्बल दोन वर्षांहून अधिक काळ हा प्रकार सुरू होता. या प्रकरणात दोन पोलिसांसह पोलिस खबऱ्या अशा तिघांना अटक केली. त्या तिघांनाही न्यायालयाने १५ मेपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. एका पोलिसाने, तर व्यवहाराचे पैसे घेण्यासाठी चक्क क्यूआर कोडचा वापर केला. एवढेच नाहीतर कुटुंबातील काही जणांच्या खात्यावर या व्यवहाराचे पैसे घेतल्याचे तपासात पुढे आले.

**तपासणीपूर्वीच डेटा चोरी**

५ मे रोजी ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील सायबर पोलिस ठाण्यात मोबाइलमधील डेटा चोरी करून विकल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी

▶▶ उर्वरित पान २ वर

# धरणाच्या पाण्यातून मृतदेहाचे 30 तुकडे शोधणे आव्हानात्मक

**पुणे । प्रतिनिधी**

सरकारी बांधकाम व्यावसायिक असलेले विठ्ठल सखाराम पोळेकर हे नेहमीप्रमाणे १४ नोव्हेंबर २०२४ रोजी पोळेकरवाडी येथील घरातून सकाळी साडेसहाच्या सुमारास मॉर्निंग वॉकला निघाले. घरातून निघाल्यानंतर सिंहगडाच्या दिशेने पायी जाणे हा त्यांचा नित्यक्रम. मात्र, ती सकाळ त्यांच्या आयुष्यातील शेवटची सकाळ ठरली. त्याच गावातील सरपंच महिलेच्या गुंड नवऱ्याने नियोजन करून ▶▶ उर्वरित पान २ वर

# इच्छित स्थळी सहजतेने बदली झाल्याने अधिकारी झाले खूश!

**पुणे । प्रतिनिधी**

पुन्हा एकदा इतिहास घडविताना या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार होतेयं याचा मला अतिशय आनंद होत आहे. अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवून भ्रष्टाचारमुक्त धोरण राबविणे यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा निर्णय मी घेतला.हा निर्णय भविष्यातही कायम राहील. गाव पातळीवर कष्ट



करणाऱ्या सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तुमच्या बदल्या मनासारख्या केल्या आहेत, आता चांगले आणि फ्रेश मनाने काम करा, अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधला.राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा आणि बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये बालविवाहानंतर 15 वर्षाखालील 10 मुली गर्भवती, तर 11 जणींची प्रसूती

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात बालविवाहाबाबत धक्कादायक अशी आकडेवारी समोर आली आहे. आरोग्य विभागाच्या प्रजनन व बाल आरोग्य पोर्टलवरील नोंदीनुसार गेल्या वर्षभरात १८ वर्षांखालील १२ मुली गर्भवती झाल्याचं आढळलंय. तर तब्बल ११ मुलींची प्रसूती झाली असून त्यांचे वय १३ ते १७ वर्षे इतकं आहे. बीड, गेवराई, वडवणी, आष्टी, केज, धारूर, शिरूरकासार




या तालुक्यांतील घटना यामध्ये समाविष्ट आहेत. आरोग्य विभागाच्या आरसीएच पोर्टलवर गर्भवतींच्या नोंदीत अल्पवयीन मुलींच्या पतींचं नावही आहे. त्यामुळे मुलींचे बालविवाह झाल्याचं यातून स्पष्ट होतं. गेल्या वर्षभरात १२ मुली गर्भवती झाल्या असून त्यातल्या १० मुलींचं वय फक्त १५ वर्षे इतकं होतं. तर बीड जिल्हा रुग्णालयात १३ ते १७ वयोगटातल्या ११ मुलींची प्रसूती झाली. यातल्या बहुतांश मुली या लैंगिक अत्याचाराच्या बळी होत्या.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा काय सांगतो?**

बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ नुसार १८ वर्षांखालील मुलींचा आणि २१ वर्षांखालील मुलांचा विवाह बेकायदेशीर आहे. या कायद्यानुसार, बालविवाह लावून देणाऱ्या पालक, मध्यस्थ व नातेवाईकांना दंड आणि तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. बालविवाहाची खळबळजनक आकडेवारी समोर आल्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# सोमवारी अजित पवार बीड जिल्हा दौऱ्यावर

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार सोमवारी बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते जिल्हा नियोजन समितीसह इतरही बैठका घेणार आहेत. बीडचे पालकमंत्री झाल्यानंतरचा त्यांचा हा बीडचा तिसरा दौरा असणार आहे.बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहेत. अजित पवारांनी मागच्या दौऱ्यात जिल्हा प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेतला होता, तसेच प्रशासन गतिमान करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बीड जिल्ह्यात विमानतळ तसेच इतर बाबींसाठी अजित पवारांनी



पुढाकार घेतला होता. अजित पवारांच्या मागच्या दौऱ्यानंतर बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली होऊन विवेक जॉन्सन बीडचे जिल्हाधिकारी म्हणून पाहत आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर



# सरन्यायाधीशांची काल शपथ, आज निकाल; पहिल्याच निर्णयात नारायण राणेंना झटका, मिलीभगत पाहून खडसावलं




देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतल्यानंतर भूषण गवई (इर्हीहरप सर्रींरळ) यांनी पहिलाच निकाल म हाराष्ट्रातील प्रकणावर दिला आहे. विशेष म्हणजे तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणेंना दणका देत सरन्यायाधीशांनी ३० वर्षांपूर्वीच्या खटल्यात महत्त्वाचे निर्दे श दिले आहेत. सन १९९८ साली युती शासनाच्या काळात नारायण राणे हे म हसूल मंत्री असताना वन विभागाची ३० एकर जमीन बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी राणेंनी घेतलेला हा निर्णय रद्द केला आहे. तसेच, पुण्यातील (ींपिश) ती जमीन पुन्हा वन विभागाला देण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्यामुळे, सरन्यायाधीशांच्या पहिल्याच निर्णयात भाजप खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणेंना (छ्रीरूप ीरपश) दणका बसला आहे. भारताचे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांनी पहिला निकाल दिला, तो पुण्यातील वन विभागाच्या जमिनीशी संबंधीत आहे. वन विभागाची पुण्यातील ३० एकर जागा बिल्डरला देण्याचा निर्णय म्हणजे राजकारणी, प्रशासकीय अधिकारी खासगी बिल्डरसोबत कसे काम करतात याचं ढळढळीत उदाहरण आहे, असेही भूषण गवई यांनी या निर्णयात म्हटलं आहे. वन विभागाची पुण्यातील कोंढवा भागातील शेकडो कोटी रुपयांची ३० एकर जागा रिची रिच सोसायटीसाठी बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी पुरातत्व खात्याच्या रेकॉर्ड्समध्ये फेरफार करण्यात आले होते. हे सगळं उघडकीस आल्यानंतर या जागेबाबतचे सर्व निर्णय बेकायदेशीर ठरवून ही जागा वन विभागाला परत देण्याचा निर्णय सरन्यायाधीश गवई यांनी दिला आहे.

देशातील सर्वच राज्यांना दिले आदेश- भुषण गवई यांच्यासह तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने पुण्यातील ३० एकर जागा वन विभागाला परत देताना संपूर्ण देशात ज्याचा दूरगामी परिणाम होईल असा निर्णय दिलाय. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन त्यांच्या राज्यात अशाप्रकारे वन विभागाच्या जमीनी हडप केल्या गेल्या असतील तर त्याचा तपास करण्याचे आदेश दिले आहेत. या जमीनी १ वर्षाच्या आत पुन्हा सरकारजमा करुन घेण्यात याव्यात असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलंय जर जमिनीवर बांधकाम उभे राहिल्याने जमीन परत घेणं शक्य नसेल तर बाजारभावाप्रमाणे मोबदला वसुल केला जावा, असेही सर्वोच्च न्यायालय म्हटलं आहे.

काय आहे हे संपूर्ण प्रकरण

✻ पुण्याच्या कोंढवा भागातील ३० एकर जागा वन विभागाची असताना देखील ती चव्हाण नावाच्या व्यक्तीला देण्याचा निर्णय नारायण राणे यांनी १९९८ साली महसूल मंत्री या नात्याने घेतला होता. ही ३० एकर जागा आपली शेतजमीन असल्याचा दावा चव्हाण नावाच्या व्यक्तीने केला होता. मात्र जमीन ताब्यात येताच चव्हाण नावाच्या व्यक्तीने ही जागा रिची रीच सहकारी संस्थेला दोन कोटींना विकली विकली.

✻ आश्चर्य पुढच्या काही दिवसांमध्ये त्यावेळचे पुण्याचे विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उपवन संरक्षक अशोक खडसे यांनी ही जागा बिगर शेती असल्याचे प्रमाणपत्र दिले. ज्यामुळे या जागेवर बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला.

✻ रिची रिच सोसायटी या जागेत १५५० फ्लॅट्स , तीन क्लब हाउसेस आणि ३० रो हाऊसेस आणि शॉपिंग कॉम्प्लेक्सचा समावेश असलेला भव्य प्रकल्प उभारणार होतं .

✻ सिटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे , ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज आणि रहेजा बिल्डर्स यांनी एकत्र येऊन रिची रिच सोसायटी स्थापनं केली होती .

## पान १ वरून पुढे...

### स्थानिक स्वराज्य...

कोरोना संकटामुळे मुंबई महापालिकेसह इतर महापालिकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. प्रशासकाद्वारे या सर्व महापालिकांचा कारभार चाललेला. याविरोधात डिसेंबर २०२१ मध्ये राहुल वाघ यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर तब्बल चार वर्षांनंतर न्या. सूर्य कांत आणि न्या. नॉंगमेईकपम यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. पक्षाकडून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत

### पदभार हाती...

याचिकांवर सुनावणी करत होते. या प्रकरणात याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद १४ ऑक्टोबर २०२४ रोजी संपला होता. महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या जवळजवळ एक तृतीयांश लोकसंख्या असलेल्या म राठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये दहा टक्के आरक्षण देणारा २०२४ चा कायदा गेल्या वर्षी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान राजकीय चर्चेत आघाडीवर होता. मात्र, त्याबाबतची सुनावणी झाली नव्हती. त्यातच आगामी शैक्षणिक सत्रामुळे निर्माण झालेली निकड आणि मुंबई उच्च न्यायालयाकडून निर्णय घेण्यास होणारा विलंब याकडे याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधले होते.

मराठा आरक्षणासंदर्भात सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी काम काजाच्या पहिल्याच दिवशी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या द्विपीठासम ोर ही सुनावणी झाली आहे. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाबाबत म हत्त्वपूर्ण निर्देश देताना नवीन खंडपीठाची निर्मिती करण्याचे सांगितले आहे.

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय डउइउ प्रवर्गातंर्गत वैद्यकीय प्रवेशासाठी मराठा विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देण्यात आलेल्या याचिकांवर तत्काळ नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात लवकरच मराठा आरक्षणाचा मुद्दा निकाली लागणार असल्याने सर्वांचे त्याकडे लक्ष लागले आहे.

### वरिष्ठ हवालदाराला....

अधिकाऱ्यांची संख्या आहे. त्यामुळे गुन्ह्यांचा तपास हा पोलिस उपनिरीक्षक पदापासून वरील अधिकाऱ्यांकडे दिला जातो. तर

## पान १ वरून पुढे...

ग्रामीण भागात या अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे एकाच अधिकाऱ्याकडे गुन्ह्याचा तपास असल्यास अधिकाऱ्यांवर ताण वाढत असल्याचं निदर्शनास आलंय. सध्या पोलिस भरतीमध्ये उच्चशिक्षित तरुण भरती होत असल्याने त्यांच्या अनुभवाची आणि बुद्धीमत्तेची दखल घेत त्यांच्याकडे छोट्या गुन्ह्यांचा तपास देण्याचा निर्णय घेण्यात आलायं.

ब्रेकिंग : कर्नल सोफिया कुरेशींवरील वादग्रस्त विधान भाजप नेत्याला भोवलं; गुन्हा दाखल करण्याचे आदेश दरम्यान, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांवरचा ताण काही प्रमाणात कमी होणार असून गुन्ह्यांचा छडा लावण्याचा आलेखही वाढणार असल्याचा विश्वास गृह खात्याकडून व्यक्त करण्यात आला.

### धरणाच्या पाण्यातून...

त्यांचे कारमधून अपहरण केले. अपहरण केल्यानंतर ४६ मिनिटांत आरोपींनी पोळेकर यांचा खून केला. वडील बराच वेळ झाला तरी घरी आले नसल्याने त्यांच्या मुलाने पोलिसांत तक्रार दिली. पोलिस तपासात पोळेकर यांचा खून झाल्याचे स्पष्ट झाले. पोळेकर यांचा मृतदेह नेमका कुठे आहे, तो नष्ट केला असेल तर कसा केला याचा उलगडा होणे महत्त्वाचे होते. खंडणीसाठी सरकारी बांधकाम व्यावसायिकाची हत्या झाल्याने संपूर्ण पुणे हादरून गेले होते.

हवेली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने तपासाला सुरूवात केली. पोलिसांना पोळेकर यांच्या मृतदेहाचे आरोपींनी २५ ते ३० तुकडे केले असून, ते खडकवासला धरणाच्या बॅक वॉटरमध्ये टाकले असल्याची माहिती समजली. त्यानंतर दोन दिवसांच्या शोध मोहिमेनंतर पोलिसांना पानशेत धरणातून (सुमारे १० ते १२ किमी लांब अंतरावर) मृतदेहाचे तुकडे सापडले. त्यानंतर पोलिसांसमोर आरोपींना पकडण्याचे आव्हान निर्माण झाले.

### 'सोडूनी सारी...

आकाश सुर्वे आणि हर्षद परब या दोन पोलिसांसह मोहम्मद सोहेल मोहम्मद शब्बीर राजपूत या खबऱ्याला अटक केली. गुन्हे शाखेने त्या तिघांचे मोबाइल जप्त केले असून, खबऱ्याची गाडीही ताब्यात घेतली. तर, मोबाइल तपासणीपूर्वी खबऱ्या दोघांना माहिती काढण्यास सांगायचा. त्या बदल्यात तो ठरल्याप्रमाणे पैसे देत होता, तर मोबाइलच्या तपासणीत एका पोलिस शिपायाने क्यूआर कोडचा वापर करून पैसे घेतल्याचे समोर आले.

## पान १ वरून पुढे...

अटकेत असलेला मोहम्मद सोहेल मोहम्मद याच्याकडे पीएसआय पोलिस अधिकाऱ्याचा ड्रेस, पोलिस काठी, वायरलेस, पोलिस कॅप, गाडीवर पोलिसांचे स्टिकर आदी वस्तू आढळल्या. याशिवाय तो लॉजवर राहताना पोलिस असल्याची बतावणी करून राहत असल्याचेही तपासात समोर आले आहे.

लोकेशनच्या नोंदींचीही विक्री

अटकेतील पोलिस परब याने एसडीआर आणि मोबाइल लोकेशन, तर सुर्वे याने सीडीआर याबाबतची माहिती चोरून विक्री केल्याचे तपासात पुढे आले आहे. यामध्ये परब याने १०० मोबाइल फोनचे लोकेशन दिले असून, ते लोकेशन नेमके कशासाठी दिते, त्यातून कोणता गुन्हा घडला आहे का ? याचा तपासही सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

### इच्छित स्थळी...

आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नुकताच घेतला होता. या बदल्यांची प्रक्रिया आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयात श्रीमती. पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत सुरू झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामा०स्वामी, आयुक्त प्रवीण कुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे यावेळी उपस्थित होते.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, ग्रामविकास मंत्री असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचा निर्णय मी घेतला होता, त्यावेळी त्याचा फायदा अनेक शिक्षकांना जे तिथपर्यंत पोहोचू शकत नव्हते त्यांना झाला. आऊट ऑफ बॉक्स जाऊन निर्णय घेण्याची आवड असल्याने आताही पशुसंवर्धन विभागासाठी मी हा निर्णय घेतला. एकदा घेतलेला निर्णय बदलत नाही, त्यामुळे भविष्यातही हा निर्णय कायम राहणार आहे. माझे वडील लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे, ज्याची पत नाही, ऐपत नाही त्यांचा आवाज बनण्यासाठी मी राजकारणात आहे, अगदी तोच वारसा घेऊन मी काम करत आहे. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य लोकं आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही काम करता, त्यामुळे हा निर्णय घेतला. सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला महत्वाचा वाटतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी आपल्या परिवारापासून दूर असणारे, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यामुळे हवी ती पोस्टींग मिळणार आहे. हव्या त्या ठिकाणी बदल्या झाल्याने तुमच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद समाधान देणारा आहे, असं श्रीमती मुंडे यावेळी म्हणाल्या.

पशुवैद्यकीय शिक्षणानंतर शासन सेवेत पदार्पण करणाऱ्या

## पान १ वरून पुढे...

पशुवैद्यकांना लोकसेवक म्हणून पशुसेवा करण्याची उत्तम संधी प्राप्त होत असते. पशुसंवर्धन विभागाचा आजवरचा गौरव टिकवून ठेवत या विभागाची प्रतिष्ठा आणखी उंचावण्याची सामुहिक जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. त्यासाठी पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता क्षेत्रीय स्तरावर सहजतेने करुन देणे आवश्यक आहे. या कामात समर्पित वृत्तीने सर्वांनी योगदान देत विभागाचा नावलौकीक वाढवावा, असे आवाहन सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी केले.

पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकीय सेवा, धोरणात्मक निर्णय व योजनांच्या अंमलबजावणीबाबत जनजागृती करण्यासाठी महापशुधन वार्ता या शिर्षकांतर्गत डिजीटल ई-मासिक सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महापशुधन वार्ता' या मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

पशुपालकांना पशुसंवर्धनाच्या व्यवसायाची माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी व आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन पद्धतीनुसार पशुपालकाच्या उत्पन्नात भर पडावी, या उद्देशाने विभागाने हे ई-मासिक सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक पशुपालकाला हे मासिक एका क्लिकवर उपलब्ध व्हावे, यासाठी विभागामार्फत मासिकाच्या अंकाचा 'क्यूआर कोड तयार करण्यात आला आहे. या क्यूआर कोडचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हवी ती पोस्टींग मिळाली, अधिकारी खूश!

### बीडमध्ये बालविवाहानंतर...

बीडमध्ये साखर कारखान्यात काम करणाऱ्या स्थलांतरित मजुरांमध्ये बालविवाहांचं प्रमाण जास्त आहे. आर्थिक अडचणी, मुलींच्या सुरक्षेची भीती यांसारख्या कारणांनी पालकांकडून मुलींचं लग्न लावून दिलं जातं. बालविवाहांमुळे अल्पवयीन मुलींची गर्भधारणा, नवजात बाळासह म ुलींच्या जीवालाही धोका निर्माण होतो. आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात.

### सोमवारी अजित...

आता अजित पवार सोमवारी (दि. १९) बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यात ते नियोजन समितीची बैठक, खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक आणि विकास योजनांची आढावा बैठक घेणार आहेत. विशेष म्हणजे अजि पवारांचा हा बैठकांचा सपाटा सकाळी ८ : १५ वाजताच सुरु होणार आहे. या दौऱ्यात अजित पवार काही राजकीय कार्यक्रम घेणार का हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## पान ४ वरून पुढे...

### शेतकऱ्यांच्या 'कर्जमुक्ती'....

उपस्थित राहणार आहेत. कर्जमुक्ती मेळाव्यास अंबाजोगाई तालुक्यातील व मांजरा ग्रीन बेल्ट परिसरातील शेतकऱ्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मेळाव्याचे निमंत्रक क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री.कुलदीप करपे ,मांजरा परिसरातील युवा शेतकरी नेते श्री.अरुण आबा पवार यांनी केले आहे.

### शिवसंग्राम मध्ये...

जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे,धर्मराज मागदे सर , मनोज जाधव, विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील, अशोक लोकरे, शेषेराव तांबे, कैलास शेजाळ आदी. उपस्थित होते. डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत आज असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी मंचावर शिवसंग्राम चे विविध पदाधिकारी उपस्थित होते. हा पक्षप्रवेश शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आला असून यावेळी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी त्यांच्या हयातीमध्ये युवक, तरुण, विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी केलेले कार्याला उजाळा देताना डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या की, मेटे साहेबांनी त्यांच्या हयातीमध्ये अनेक तरुणांना रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून त्यांच्या हाताला काम दिले त्याचबरोबर पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवण्याचे काम केले, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना दर रविवारी पुणे येथे मोफत जेवणाची व्यवस्था केली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजग समाज निर्मितीसाठी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे यासाठी व्यसनमुक्तीचा लढा उभा केला या सर्व कार्यांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम मध्ये युवक मोठ्या प्रमाणात सामील होत आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे. आपण सर्व एकत्रितपणे मेटे साहेबांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करू आणि शिवसंग्राम तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करू अशी साद त्यांनी यावेळी घातली. यावेळी प्रवेश केलेल्या युवकांना आणि विद्यार्थ्यांना विद्यार्थी आघाडीच्या विविध पदांवर जबाबदारी देण्यात आली.

विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी जाहीर- या पक्षप्रवेशा वेळी विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी निवडण्यात आली यात शिवसंग्राम विद्यार्थी आघाडी जिल्हा सरचिटणीस पदी तुषार डोळे, जिल्हा उपाध्यक्षपदी वैभव घुमरे, अनिकेत साळवे, शहराध्यक्षपदी आकाश

## पान ४ वरून पुढे...

हाजारे, शहर उपाध्यक्षपदी अहिलेश वाघमारे, शहर सचिव पदी उदयराज कुलकर्णी, शहर सहसचिव पदी प्रद्युम्न परजणे यांची निवड करण्यात आली.

### नागरी संरक्षण...

अपघात, सार्वजनिक आपत्कालीन परिस्थिती आणि इतर अनपेक्षित परिस्थितीत नागरी प्रशासनाला पूरक ठरू शकणारी एक सुप्रशिक्षित प्रतिसाद देणारे आणि लवचिक स्वयंसेवक दल तयार करणे हे या उपक्रम ाचे उद्दिष्ट आहे. सध्याची परिस्थिती आणि उदयोन्मुख सुरक्षा चिंता लक्षात घेता, एक मजबूत समुदाय-आधारित प्रतिसाद यंत्रणा स्थापन करण्याची तातडीची आणि वाढती गरज आहे. नोंदणी प्रक्रिया सोपी आहे आणि अधिकृत मायभरात पोर्टलद्वारे (https://mybharat.gov.in) उपलब्ध आहे. या राष्ट्रीय कार्यासाठी सर्व इच्छुक युवकांना, जनतेला संघटित करण्यासाठी युवकांनी पुढे यावे आणि त्यांना संघटित करावे, हे एक स्पष्ट आवाहन आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक शशांक रावुला, जिल्हा युवा अधिकारी, माय भारत बीड, मोबाईल क्रमांक ९८५०९३९८०२, ७०१३१११६७४ यावर संपर्क साधावा.

### छत्रपती संभाजी...

गणेश गिरी, पवन धोत्रे,अशोक शिनगारे,युवराज फुनने, गणेश फ ुनने,अमरजीत शिनगारे,नामदेव उकंडे,अंकुश कदम,भैय्यासाहेब साखरे,संकेत शिनगारे,निलेश शिनगारे,अमित शिनगारे, ऋषी तिबोले,लक्ष्मण गुरव,बाबुराव राऊत सह आदी नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजन विश्वास शिंगारे यांनी केले होते.

### ढेकनमोह , चौसाळा...

ज्योती विनायकराव मेटे यांनी केली होती. या सदस्य नोंदणीची सुरवात दि. २ मे रोजी जिल्ह्यात करण्यात आली. आता दुसऱ्या टप्प्यात तालुक्यात आणि सर्कल निहाय सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. यात नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह , चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा , बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागात आणि भाळवनी या ठिकाणी सदस्य नोंदणी अभियान पार पडले यावेळी या सदस्य नोंदणीस जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून लोकनेते यांचा विचार जिवंत ठेवण्यासाठी आपण शिवसंग्रामचे सदस्य होता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी

## पान ४ वरून पुढे...

शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे पाटील,उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने,युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे,गणेश धोंडरे सचिन जाधव, चौसाळा सर्कल प्रमुख विशाल हावळे, गौतम जोगदंड, राजु येडे, शिवसंग्रामचे तालुकाउपाध्यक्ष दिनकर शेळके,तालुका सचिव सिताराम घुमरे,नाळवंडी सर्कल प्रमुख नागुराव बोरगे, डेकनमोह गण प्रमुख विलास चव्हाण,पाली गण प्रमुख चंद्रकांत देवकर,विजय सुपेकर, बळीभाऊ थापडे,उल्हास घोरड,वैभव डावकर आदीसह कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवाजीनगरच्या वरिष्ठ...

कार्यालयात घुसखोरी केली व संस्थेवर बेकायदेशीर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. याविरोधात ट्रस्टच्या सचिवाने वरळी येथील धर्मादाय आयुक्त आणि शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. गेल्या महिन्याच्या २२ तारखेला या तक्रारीच्या अनुषंगाने सचिवाने बापूसाहेब देशमुख यांची भेट घेतली होती. त्यावेळी धर्मादाय आयुक्तांचा अंतिम निकाल येईपर्यंत विरोधकांना शाळेत प्रवेश न देण्यासाठी तसेच विरोधकांवर गुन्हा दाखल करण्यासाठी देशमुख यांनी पाच लाखांची मागणी केली. त्यानंतर पाचऐवजी तीन लाख देण्यास देशमुख यांनी सांगितले. परंतु लाच द्यायची नसल्याने ट्रस्टच्या सचिवाने अॅण्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली. अखेर एक लाख रुपये लाचेचा पहिला हप्ता ट्रस्टच्या सचिवाकडून घेताना वरिष्ठ निरीक्षक बापूसाहेब देशमुख यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

### गर्लफ्रेंडने फोन...

त्रास देत होता. तिने सकाळी ये म्हणल्यानंतर ही लक्ष्मण ऐकले नाही.

पहाटे ४ वाजताच तो पीडितेच्या रूमवर गेला. तिला जातीवाचक शिवीगाळ करत गळ्याला पकडून मला चापटाने मारहाण केली. तू म झा फोन रिसिव्ह का करत नाहीस, असे म्हणून मला शिवीगाळ केली. त्यानंतर पीडितेने तिच्या दाजीला बोलावून घेतले. यावेळी त्यांनाही तुझा काय संबंध आहे आमच्यामध्ये का बोलतोस, असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी अॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पान ४ वरून पुढे...

### आमदार सुरेश...

मिळणार आहे असे प्रतिपादन आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आष्टी येथील परिवहन महामंडळ आगारामध्ये नवीन पाच लालपरी बसेस दाखल झाल्या आहेत त्यांचे स्वागत करताना ते बोलत होते यावेळी वाहतूक नियंत्रक हर्षद गुगळे मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट चे उपाध्यक्ष गणेश नाना शिंदे नगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, खंडू जाधव, अजित मुळे, नगरसेवक ज्ञानदेव राऊत, प्रवीण कदम, शमशोद्दीन, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक श्याम वाल्हेकर,आष्टी तालुका पत्रकार संघ अध्यक्ष प्रविण पोकळे ,पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार रघुनाथ कर्डीले, पत्रकार गणेश दळवी, पत्रकार सचिन रानडे, आगार व्यवस्थापक चोथमल, वाहक सचिन काळे, मुख्तार तांबोळी, के.जी.गव्हाणे, राजेंद्र बांगर, रघुनाथ ससाणे, शरद झांबरे, बाबू कुरेशी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना जिया बेग म्हणाले आमदार सुरेश धस यांनी आष्टीच्या आगाराकडे सतत लक्ष दिलेले आहे मध्यंतरी त्यांनी स्वखर्चातून टायर चेंज मशीन आगारासाठी भेट दिले आहे आता या नवीन बसेस आल्यामुळे लांब पल्ल्यांच्या प्रवासासाठी जाणाऱ्या प्रवाशांची हेळसांड थांबेल असा विश्वास व्यक्त केला. आष्टीच्या आगारातील निम्म्याहून अधिक बसेस जुन्या झाल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याच्या तक्रारी येत असल्यामुळे आ.सुरेश धस यांनी परिवहन मंत्री, महाव्यवस्थापक या महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधल्यानंतर एसटी महामंडळाने तातडीने हालचाली सुरू केल्या.आणि आष्टी आगारासाठी अत्याधुनिक अशा पाच नवीन बीएस-६ गाड्या आज गुरुवारी (१५ मे) दुपारी आगारात दाखल झाल्या या पाच लाल परी बसेसच्या स्वागत करण्यात आले.

### आनंदऋषीजी हॉस्पिटल....

लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे. या शिबीरात डायलेसिस असणार्या गरजू रुग्णांना महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत

डायलेसिस मोफत केले जातील. शिबीरात तज्ञ डॉक्टर्स - नेफ्रॉलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# साईबाबांच्या शिर्डीत मोठी चोरी, 3 कोटी 26 लाखांचे साडेतीन किलो सोने आणि 4 लाखांची रोकड लंपास

**शिर्डी । प्रतिनिधी**

शहरात एक धक्कादायक चोरीची घटना घडली आहे, ज्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. एका हॉटेलमधून तब्बल ३ कोटी २६ लाख रुपयांचे साडेतीन किलो सोने आणि ४ लाखांची रोकड चोरीला गेल्याने व्यापारी आणि पोलिस यंत्रणा हादरली आहे. या प्रकरणात मुंबईतील एका सोन्याच्या व्यापाऱ्याने आपला चालकावरच संशय व्यक्त केला असून, पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.

**▶ घटनेची पार्श्वभूमी**

मुंबईतील सोन्याचे होलसेल व्यापारी विजयसिंह वसनाजी खिशी (वय ३५, रा. आवाल घुमटी, गुजरात) हे ७ मे रोजी शिर्डीत आले होते. त्यांच्यासोबत त्यांचा कामगार चंद्रप्रकाश प्रजापती आणि चालक सुरेश कुमार भुरसिंह राजपुरोहित (रा. चौहटन, राजस्थान) होते. खिशी यांनी आपल्या फर्ममधून सुमारे ४ किलो ८७३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने घेऊन अहिल्यानगर ते मनमाड या भागातील सराफ दुकानांना भेटी देण्यासाठी प्रवास सुरू केला होता. ते शिर्डीतील हॉटेल साई सुनीताच्या रूम नंबर २०१ मध्ये मुक्कामी थांबले होते. या प्रवासादरम्यान ते दररोज दिवसभर सराफ दुकानांना भेट देत आणि रात्री हॉटेलवर परतत.

**▶ चोरीचा प्रकार उघडकीस**

१३ मे रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास खिशी आणि त्यांचे सहकारी जेवण करून रूममध्ये झोपले. सोन्याच्या दागिन्यांनी भरलेली बॅग त्यांनी रूममधील बेड आणि टेबलच्या मध्ये ठेवली होती. रूम आतून लॉक करण्यात आली होती, आणि खिशी, चंद्रप्रकाश आणि सुरेश कुमार हे तिघेही एकाच रूममध्ये झोपले होते. मात्र, १४ मे रोजी सकाळी ६ वाजता खिशी यांचा चुलत भाऊ शैलेंद्रसिंह हा पेमेंट घेण्यासाठी हॉटेलवर आला तेव्हा त्याला रूमचा दरवाजा उघडा आढळला. आत पाहिल्यावर चालक सुरेश कुमार रूममध्ये नव्हता, परंतु त्याचा मोबाइल फोन आणि कपडे तिथेच होते. खिशी यांनी तातडीने बॅग तपासली असता, त्यातील सुमारे ३.५ किलो सोन्याचे दागिने (३ कोटी २२ लाख रुपये किमतीचे) आणि ४ लाखांची रोकड गायब असल्याचे समोर आले.

**▶ चालकावर संशय आणि पोलिस तपास**

खिशी यांनी चालक सुरेश कुमारवरच चोरीचा थेट संशय व्यक्त केला आहे. सुरेश हा गेल्या दोन महिन्यांपासून त्यांच्याकडे चालक म्हणून काम करत होता, आणि त्याच्यावर त्यांनी पूर्ण विश्वास ठेवला होता. मात्र, त्याने हा विश्वासघात केल्याचा आरोप खिशी यांनी केला आहे. विशेष म्हणजे, सुरेशने आपला मोबाइल आणि कपडे रूममध्येच ठेवले आणि स्वतः पसार झाला, ज्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला आहे.

या प्रकरणी पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक वैभव कलबुर्मे, आणि पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे दिनेश आहेर, तुषार धाकराव आणि शिर्डीचे पोलिस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्यासह उपनिरीक्षक निवांत जाधव तपास करत आहेत. नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही तपासासाठी शिर्डीला रवाना झाले आहे.

# बाळनाथ विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम...

**बीड । प्रतिनिधी**



तालुक्यातील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेचा या वर्षीचा १० वी चा निकाल हा शंभर टक्के लागला आहे. श्री उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बाळनाथ विद्यालय चाकरवाडी तालुका जिल्हा बीड १० वी फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल शंभर टक्के लागला आहे ४१ पैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे २४ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत २ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. जगताप दीक्षा भाऊसाहेब ९४.२०% घेऊन प्रथम क्रमांक मिळवला हे. तसेच द्वितीय क्रमांक डोईफोडे मानसी चंद्रकांत ९३.६०% या विद्यार्थिनीने मिळवला आहे. तृतीय क्रमांक जगताप स्वरूपा अतुल ९३.२०% यांनी मिळवला आहे. तसेच विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी मध्ये आपला क्रमांक मिळवला असून विद्यालयाचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे तसेच कवडे काजल केशव ९२.८०, जांभळे वैभव सुरेश ९१.८०, अनवणे राजनंदिनी राजेंद्र ९०.८०, पोटरी अंजली श्रीराम ९०.००, डोईफोडे कन्हैया शशिकांत ८८.४०, दाइगडे ओमराजे ज्ञानेश्वर ८७.८०, भोसले सायली हरिदास ८७.२०, सावंत राज रोहिदास. ८५, कानडे स्नेहा बळीराम ८४.००, जगताप अक्षय राजेंद्र ८३,जांभळे वैभव अप्पाराव ८२, चाळक रोहित राजेंद्र ८१ टक्के घेत सर्व उत्तीर्ण झाले आहेत सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती डॉ. ज्योती मेटे मॅडम तसेच संस्थेचे सचिव आशुतोष भैय्या मेटे संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री फाटक सर, चाकरवाडी गावचे आदर्श सरपंच कवडे सर तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य मुख्याध्यापक जगताप टी. आर. वर्गशिक्षक श्री कदम सर. परीक्षा विभाग प्रमुख श्री नखाते सर सर्व शिक्षक कर्मचारी ग्रामस्थ व सर्व पंचक्रोशीतील पालक यांनी अभिनंदन केले आहे व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाल्याबद्दल गुणवंत विद्यार्थी आदित्य उफाडेवर शुभेच्छांचा वर्षाव

## स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने विशेष सत्काराचे आयोजन



**माजलगांव । प्रतिनिधी**

नागडगावचा सुपुत्र आदित्य मच्छिंद्र उपाडे याने आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द व चिकाटीच्या जोरावर दिनांक १३ मे २०२५ रोजी. लागलेल्या दहावी बोर्डाच्या निकालात विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यात आपले नाव कोरले व मोठ यश संपादन केले. आदित्य उफाडे स्वामी विवेकानंद विद्यालयाचा विद्यार्थी असून त्यांन इयत्ता दहावी च्या बोर्ड परीक्षेत ८६ टक्के घेऊन विद्यालयात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आदित्य मच्छिंद्र उपाडे सह सर्व विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे मुख्याध्यापक जगताप सर, करांडे, माने, थेटे, रकटे, खडके, बनसोडे, राठोड सह सर्व शिक्षक शिक्षिका सर्व यांच्या वतीने विशेष सन्मानित करण्यात आले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव राहुल काका जगताप यांच्या वतीनेही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन करण्यात आले. आदित्य उफाडे याच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून विशेष कौतुक करून अभिनंदन करण्यात येत आहे.


# सुभद्राबाई माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ कोरडेवाडी ता केज जि बीड संचलित, सुभद्राबाई माध्यमिक विद्यालय नगर रोड बीड या शाळेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी फेब्रुवारी- मार्च २०२५ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला, असून,शाळेचं शेकडा निकाल ऐकून ९१.६६%एवढा लागला आहे परीक्षेत ऐकून ५० विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. चि. लांडे समर्थ विकास ९२.००% गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळवला आहे.चि. यादव अनिकेत बंन्सी ९०.६०% गुणांसह द्वितीय क्रमांक.चि. ढेंगळे संभाजी पांडुरंग ८७.००% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे.

# ९४ टक्के गुण मिळवत अलिशा जावेद पठाण हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**आष्टी । प्रतिनिधी**



पत्रकार जावेद पठाण यांची कन्या अलिशा जावेद पठाण हिने माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी)च्या परिक्षेत ९४% गुणाने उत्तीर्ण होत दहावीत घवघवीत यश मिळवले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत परळी वैजनाथ येथील फाउंडेशन स्कूलच्या विद्यार्थिनी कु. अलिशा जावेद पठाण हिने ९४.००% गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. अलीशा च्या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे.

# गुजर समाजाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार: रतन गुजर, सुनील गुजर

**बीड । प्रतिनिधी**

गुजर समाजाचे विद्यार्थी दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये चांगले गुण घेऊन पास झाले व अनेक विद्यार्थी शासकीय सेवेमध्ये रुजू झाले अशा विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी समाजाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचा आयोजन शुक्रवार दि.३० मे २०२५ रोजी करण्यात आले आहे मांडवजाळी येथे राधाकृष्ण आश्रम या ठिकाणी ठीक दि.३० मे रोजी दुपारी १२ वाजता कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर आणि पदाधिकारी सुनील गुजर, महिला जिल्हाध्यक्ष रेखाताई खटाणे आणि गुजर समाजाचे लक्ष्मण बहिरवाळ यांनी केले आहे.

या कार्यक्रमासाठी नाव नोंदणी लक्ष्मण बहिरवाळ सर मुख्याध्यापक ९४२३४७०३४९, सुनील गुजर, समाजाचे जिल्हा उपाध्यक्ष ९८२२१६२६५५ अरुण नाथा खटाने, गुजर समाजाचे जिल्हा संघटक ७७४४८८१७७७ राजेंद्र गुजर, प्रसिद्धीप्रमुख ८८०६१०८२७१, शहादेव भीमराव डोंगर, शिरूर तालुका प्रमुख ७३७८५०४७६८, अशोक घोशीर, जिल्हा उपाध्यक्ष ७६६६६४६५०१ , सुनील बहिरवाळ कृषी सहाय्यक मांडवजाळी ९७६७२८३८५६, अशोक गुजर धसपिंपळगाव ८०८०५९६०५१, अर्जुन बहिरवाळ ९५४५२१५५५५ या सर्व समाज बांधवाजवळ आपले नाव व मार्क लेखी स्वरूपात द्यावेत असे पत्रकाद्वारे कळविले आहे.

# मयुरी कळकुटे चे दहावी बोर्ड परीक्षेत यश

**बीड । प्रतिनिधी**



येळंब घाट येथील बळवंत माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु. मयुरी दिलीप काळकुटे ने महा. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी बोर्ड परीक्षा घेतलेल्या होत्या. याचा निकाल दि. १३मे रोजी जाहीर करण्यात आला. इयत्ता दहावी परीक्षेत मयुरी दिलीप काळकुटे ने ९२ टक्के मार्क मिळवून घवघवीत यश संपादन केलेआहे. दहावी म्हणजे परीश्रमाची शिस्तीची आणि स्वप्नाची पहीली पायरी आहे ,तिच्या घरच्याचे एकच स्वप्न होते की त्यांची मुलगी प्रमाणिक पणे शिकावी व प्रगती करावी तिच्या घरच्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने अहोरात्र मेहनत करून जिद्द चिकाटी अभ्यासात सातत्य ठेऊन हे यश संपादन केले . या यशाबद्दल मयुरीचे शाळेचे मुख्याध्यापक ,शिक्षक ,पालक व गावकरी याच्याकडून अभिनंदन केले जात आहे व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# विद्रोही आंबेडकरी जलसा कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद

## भीमगीत, प्रबोधनातून भीमप्रेमींची जिंकली मने

**बीड । प्रतिनिधी**



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व बुध्द पौर्णिमेनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात 'विद्रोही आंबेडकरी जलसा' हा भीमगीत प्रबोधनपर कार्यक्रम पार पडला. हा जलसा कार्यक्रम सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तथा बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास भीमप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्रोही आंबेडकरी जलसा कार्यक्रमाच्या माध्यमातून भीमप्रेमींची मने जिंकली असून या भिमगीत प्रबोधन गायनाने बीडकर मंत्रमुग्ध झाल्याचे पाहायला मिळाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक-अध्यक्ष बाबूराव पोटभरे यांच्या हस्ते झाले. यावेळी अरुणाताई आठवले, श्रीहरी मोरे, राजेश साळवे, नवनाथ धाईजे, बाबासाहेब वाघमारे, आर. एस.गायकवाड, रवी वाघमारे, महेंद्र शिंदे, विजय आगलावे, जय तांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्रोही आंबेडकरी जलसा या भीमगीत गायनाची सुरुवात प्रवीण खाडे,धम्मा मुक्तीवादी, सिध्दार्थ प्रतिभावंत यांच्या सहकार्यांनी जागर समतेचा या टीमने उत्कृष्ट गायन करत त्यांनी सादर केलेल्या 'फुले-शाहु-आंबेडकर यांनी देशाला नटवलं, जग बदल घालूनी घाव.., भिमाचं पिल्लू जागं असावं' या बहारदार प्रबोधनात्मक गीतांना आंबेडकरी प्रेमींची मनमुराद दाद मिळून भीमप्रेमींची मने जिंकली. हा जलसा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शांतिदूत घोडके, वैभव वाघमारे, सचिन ससाणे, रोहन साळवे, अशोक हुंबरे, सिद्धार्थ जोगदंड, विक्की कांबळे, प्रफुल्ल गायकवाड, यांनी परिश्रम घेतले.

# नादच खुळा! शेती करुन दहावीत मिळवले १०० टक्के गुण, 'त्या' विद्यार्थ्यांची संपूर्ण महाराष्ट्रात होतेय चर्चा

**धारशिव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने काल मंगळवारी १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर केला. राज्यात दहावीचा एकूण निकाल ९४.१० टक्के इतका लागला. तसच राज्यात CBSE बोर्डाचा निकाल ९६.६० टक्के लागला. हा निकाल जाहीर झाल्यानंतर यंदाही मुलींनीच बाजी मारल्याचं समोर आलं. परंतु, संपूण महाराष्ट्रात चर्चा रंगली ती म्हणजे धारशिव येथील शेतकऱ्याच्या पोरांची.. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या विद्यार्थ्यींनी शेतीचं काम सांभाळून आणि अर्थिक अडचणींचा सामना करत यशाचं उंच शिखर गाठलं. दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के गुण मिळून इतरांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या या विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया दिलीय.



धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या जोरावर शालेय शिक्षणात ऐतिहासिक यश मिळवले आहे. धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी हायस्कूलमधील या दोन विद्यार्थ्यांनी शंभर पैकी शंभर गुण मिळवत यशाचं उंच शिखर गाठलं आहे. पृथ्वीराज पाटील आणि चैतन्य पवार यांना दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळाले आहेत.

पृथ्वीराज पाटील म्हणाला, माझ्या वडिलांचे शिक्षण झाले होते, पण परिस्थितीमुळे त्यांना ते अर्धवट सोडावे लागले. त्यांनी नेहमी मला एकच सांगितले, 'तू शिक्षण घे, तू आमच्या स्वप्नांची पूर्तता कर.' त्यांच्याच प्रेरणेतून मी हे यश संपादन करू शकलो. अभ्यास वेळच्या वेळी केला. रोज अभ्यासाला ४ तास दिले. शाळेत ज्या काही कॉन्सेप्ट शिकवल्या, त्या लगेचच क्लिअर करून घेतल्या. ज्या काही शंका होत्या, त्या शिक्षकांनी विचारून क्लिअर केल्या. दररोजचा अभ्यास दररोज केला. त्यामुळे जास्त ताण आला नाही. शेवटच्या दोन महिन्यात अभ्यासाची वेळ वाढवली. दिवसाता सहा तास अभ्यास केला. त्यामुळे पेपरमध्ये लोड आला नाही.

समाजातील गरिब घटकांना आरोग्य सुविधा सहज मिळाव्यात यासाठी मी डॉक्टर होऊन सेवा करणार आहे, असं चैतन्य पवार याने प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे. मी दररोज दोन तास मन लावून अभ्यास करत होतो. आण दररोज दोन तास अभ्यासाशिवाय कोणतंही काम नाही करायचं. मग आपल्याला यश मिळून जातं, असंही चैतन्य म्हणाला. शेतकरी म्हटलं की आर्थिक अडचणी येतात. पीक चांगलं आलं नाही की संकट येतं. वेगवेगळ्या समस्या असतात. सर्व शेतकऱ्यांना अडचणी असतातच. माझ्या वडिलांनी आम्हाला असं काही जाणवू दिलं नाही. तरी आम्हालाही थोड्या आर्थिक समस्या होत्या, असंही या विद्यार्थ्याने म्हटलं आहे.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.१६ मे २०२५



## जात प्रमाणपत्र पडताळणी सूचना

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सध्या सुरू असलेल्या सन २०२४-२०२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी वैद्यकीय आणि इतर व्यवसायिक अभ्यासक्रमा सहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील जे उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत परंतु विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकलेले नाहीत. अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय दिनांक २ मे २०२५ अन्वये शासन आदेशाच्या दिनांक पासून अधिक ३ महिन्याचा कालावधी देण्यात आलेला आहे. आधीकचा ३ महिन्याचा कालावधी हा एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहे परंतु जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारासाठीच राहील. या आधीच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश होऊ न शकल्यास त्यास संबंधित उमेदवार जबाबदार राहतील.

# शेतकऱ्यांच्या 'कर्जमुक्ती' ची मशाल पेटणार !

**● शेतकरी नेते रविकांत तुपकरांच्या उपस्थितीत देवळ्यातून राज्यव्यापी आंदोलन**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करू म्हणून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्ताधारी पक्षांनी घोषणा केली होती या घोषणेला बळी पडून शेतकऱ्यांनी प्रचंड बहूमताने महायुती सरकारला निवडून दिले. निवडून आल्यावर सरकारने या घोषणेकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याने राज्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव नसल्याने शेतकरी आत्महत्या करत आहे अशातच कर्जाच्या बोजा प्रचंड वाढल्यामुळे शेतकऱ्यांना कुठलीही बँक दारात उभा करत नाही .परिणामी बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्म हत्या वाढल्या आहेत. यासाठी राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होणे अत्यंत आवश्यक आहे यासाठी बीड जिल्हा क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने दि.१७ मे २०२५ वार शनिवारी सायंकाळी ७ वाजता मौजे देवळा ता. आंबाजोगाई जि. बीड येथे स्वराज्यातील शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.यावेळी राज्यव्यापी शेतकरी कर्जमुक्ती आंदोलनाची मशाल पेटवली जाणार आहे. मेळाव्यास क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री रविकांत भाऊ तुपकर प्रमुख मार्गदर्शन करणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह. भ. प. श्री.लालासाहेब नाना पवार, देवळा गावचे सरपंच श्री.रावसाहेब नाना यादव हे असतील. विषेश अतिथी म्हणून म्हणून शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट, क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, मा.शिक्षण व आरोग्य सभापती जि. प.बीड चे मा. राजेसाहेब देशमुख ,राष्ट्रीय काँग्रेस बीड चे जिल्हाध्यक्ष मा.राहूल सोनवणे ,कोअर कमिटीचे सदस्य मा.सत्तार पटेल ,लातुर जिल्हाध्यक्ष मा. अरुण दादा कुलकर्णी,संभाजी ब्रिगेड चे राज्य प्रवक्ते मा. अतुल गायकवाड ,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मा.नागनाथ जाधव,संभाजी ब्रिगेड चे बीड पूर्व जिल्हाध्यक्ष मा.प्रवीण ठोंबरे आदी मान्यवर

▶▶ उर्वरित पान २ वर



*ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्यानंतर जम्मू काश्मीर सिमेवर लष्करात तैनात असलेले फौजी पिम्पळा ता.आष्टी येथील सुपुत्र शेख मतीन अजिमोद्दीन यांचे पिंम्पळा येथे सूट्टीवर घरी आगमन झाले असता त्यांचा पिंम्पळा ग्रामस्थांनी सत्कार केला. फौजी शेख मतीन हे शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन यांचे एकूलतेएक सूपूत्र आहेत.*

# शिवसंग्राम मध्ये युवकांचा प्रवेश विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी जाहीर

**● लोकनेते विनायकराव मेटे साहेबांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करायचे आहे : डॉ.ज्योतीताई मेटे**

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला असून



येणाऱ्या काळात शिवसंग्रामच्या माध्यमातून युवक,तरुण ,विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी लढा देण्याचे आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार यावेळी युवकांनी केला या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्रामचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## नागरी संरक्षण स्वयंसेवक नोंदणीसाठीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या युवा कार्यक्रमाने क्रीडा मंत्रालयाने माय (MY) भारत देशभरातील तरुणांना माय भारत नागरी संरक्षण म्हणून नाव नोंदणी करण्यासाठी सक्रियपणे एकत्रित करत आहे. हे राष्ट्रव्यापी आवाहन तरुण, नागरिकांना राष्ट्रीय कार्यात विशेषत: आपत्कालीन परिस्थिती आणि संकटाच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी सक्षम करण्याच्या एकत्रित प्रयत्नांचा एक भाग आहे. नैसर्गिक आपत्ती, ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ आदर्श शिक्षक महादेव शिनगारे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक शिव-शंभुभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धारूर येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम घेऊन जयंती उत्सव मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.१४ मे रोजी धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भगवा ध्वज फडकवण्यात आला. तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन धारूर येथील ज्येष्ठ आदर्श शिक्षक महादेव शिनगारे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील शिनगारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष नितिन शिनगारे, प्रा विजय शिनगारे, विनायक शिनगारे, गणेश सावंत, शिवराज शिनगारे, संदीप शिनगारे ,सुरेश शेळके, रामेश्वर खामकर, ॲड मोहन भोसले, शिवराज शिनगारे, नितीन भाई शिनगारे, संदीप दरेकर,पत्रकार अतुल शिनगारे, विश्वास शिनगारे, ऋषिकेश गव्हाणे, सुदर्शन शिनगारे, पत्रकार ईश्वर खामकर, अविनाश ठोंबरे, कृष्णा उकंडे, महेश शिनगारे, प्रशांत शिनगारे, निलेश शिनगारे, बंटी तिबोले,

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड तालुका येथील गुगळादेवी नैसर्गिक शेतकरी गट व समृध्दी महिला शेतकरी गट ईट या दोन्ही गटातील सर्व सदस्यांनी दशपर्णी अर्क महोत्सवामध्ये सहभागी होऊन जिल्हा कृषी अधिकारी तथा आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे तसेच कृषी पर्यवेक्षक झलक दादा, जोगदंड, व पाणी फाउंडेशन चे तालुका समन्वयक शिवलेश्वर मेदने यांच्या उपस्थितीमध्ये दशपर्णी अर्क तयार करण्यात आला त्यावेळी रामप्रसाद अशोक डोईफोडे व सर्व सदस्य हजर होते.*

## ढेकनमोह , चौसाळा आणि बीड शहरात शिवसंग्रम सदस्य नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**● दुसऱ्या टप्प्यात ग्रामीण भागात शिवसंग्रामचे सदस्य नोंदणी अभियान**

**बीड । प्रतिनिधी**

पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. १३ मे रोजी नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह येथे तर आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या



जयंतीनिमित्त चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा येथे सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेली शिवसंग्राम तळागळा पर्यंत पोहचवण्यासाठी शिवसंग्राम सदस्य नोंदणी कार्यक्रम आपण हाती घेत आहोत अशी घोषणा शिवसंग्राम अध्यक्ष डॉ.

▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवाजीनगरच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला १ लाखाची लाच घेताना पकडले

**शिवाजीनगर । प्रतिनिधी**

एका डॉक्टरला अटक करताना आवश्यक प्रक्रिया न केल्याने वरळीच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकावर निलंबनाची कारवाई झाल्याचे प्रकरण ताजे असतानाच गोवंडीच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक बापूसाहेब देशमुख यांना एका ट्रस्टच्या सचिवाकडून १ लाखाची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. निवृत्ती अवघ्या १५ दिवसांवर आली असताना बापूसाहेब देशमुख यांना पैशांची लालसा भोवली. बापूसाहेब देशमुख ( ५७ ) असे त्या वरिष्ठ निरीक्षकाचे नाव आहे. निवृत्तींच्या उंबरठ्यावर असताना



देशमुख एक लाख घेताना ट्रॅप झाल्याने पोलीस दलातून संताप व्यक्त होत आहे. एका ट्रस्टच्या सचिवाने केलेल्या तक्रारीच्या आधारे देशमुखांवर ही कारवाई करण्यात आली. ऑगस्ट २०२४ मध्ये काही व्यक्तींनी ट्रस्टच्या शाळेच्या गेटचे कुलूप तोडून

▶▶ उर्वरित पान २ वर

## गर्लफ्रेंडने फोन न उचलल्याने तरुणाचा संताप, पहाटेच घरात घुसून मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

खासगी रुग्णालयात काम करणारे दोघेजण तीन वर्षे रिलेशनशिपमध्ये राहिले. परंतु आता तरूणीने फोन न उचलल्याने तिला पहाटेच्या सुमारास घरात घुसून गळा दाबत मारहाण करत जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच तिच्या दाजीला ही जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा प्रकार १२ मे रोजी पहाटेच्या सुमारास स्वराज्यनगर भागात घडला. याप्रकरणी दारूड्या तरूणावर शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. लक्ष्मण सपकाळ (वय २५ रा. सुर्डी ता.



गेवराई) असे आरोपीचे नाव आहे. पीडिता ही वडवणी तालुक्यातील रहिवासी असून लक्ष्मण व ती एकाच खासगी रूग्णालयात काम करतात. तीन वर्षांपासून ते रिलेशनशिपमध्ये होते. त्यांचे फोनवर ही बोलणे होत असे. लक्ष्मण हा पीडिता सध्या बीडमध्ये राहत असलेल्या किरायाच्या घराकडेही चकरा मारत असे. १२ मे रोजीही तो दारूच्या नशेत होता. मला तुझ्या रूमवर यायचे आहे, असे म्हणत तो पीडितेला

▶▶ उर्वरित पान २ वर

# आमदार सुरेश धस यांच्या मागणीला यश आष्टी एसटी महामंडळामध्ये पाच लालपरी दाखल

**● नवीन दाखल झालेल्या पाच लालपरींमुळे आष्टी आगाराला मिळेल ऊर्जा: नगराध्यक्ष जिया बेग**

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळ आष्टी आगाराचे दररोजचे सात ते आठ लाख रुपये लाख उत्पन्न असूनही आष्टी आगारातील अर्ध्याहून अधिक बस दहा वर्षाच्या पुढच्या असून बस बसेस या वय संपलेल्या असूनही सेवेत आहेत त्यामुळे नविन बस नसल्यामुळे लांब पल्ल्यांच्या बस सेवा सुरू



करता येत नव्हत्या त्यामुळे प्रवाशांची होणारी हेळसांड पाहता आ. सुरेश धस यांनी परिवहन मंत्री आणि महाव्यवस्थापक यांच्याकडे सतत पाठपुरावा त्यामुळे आष्टी आगाराच्या ताफ्यात पाच नवीन लाल परी बसेस आष्टी आगारात दाखल झाल्या आहेत त्यामुळे आगाराचा नवीन ऊर्जा

▶▶ उर्वरित पान २ वर

### गाड्यांचे आगमन आणि उत्साही स्वागत

**आष्टी आगारात आज दुपारपर्यंत बीएस-६ प्रकारच्या पाच नव्या गाड्या दाखल झाल्या असून, या गाड्यांच्या आगमना नंतर आष्टीकर नागरिक व प्रवाशांच्या वतीने नवीन लाल पऱ्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी या पाच ही लालपरींची आष्टी शहरातून फेरी आयोजित करण्यात आली.**

## आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे बुधवार दि. २१ मे रोजी मोफत किडनी विकार शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे बुधवार दि २१ मे रोजी १२ ते २ किडनी आजारावरती शिबिर अंगावर सुज येणे, लघवी कमी / लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस इ. उपचार. किडनी ट्रान्स्प्लांट विषयक मार्गदर्शन. व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी किडनी आजार असणार्या रुग्णांनी या सेवेचा ▶▶ उर्वरित पान २ वर

